


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : ७१६ . वा | शुक्रवार | दि. २२ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# प्रतापरावांबाबत भाजप कार्यकर्ते,मतदरांमध्ये तीव्र नाराजी...

## १५ वर्षात प्रतापरावने भाजपची घोर उपेक्षा च केली...

भाग-12

### कुटेंचा आग्रह कशासाठी ?

जनसंचलन/बुलढाणा

पंधरा वर्ष प्रतापराव खासदार होते. त्या काळात भाजपच्या एकाही नेत्याला, कार्यकर्ते यांना कुठल्याही समितीवर घेतले नाही अशी चर्चा आहे. साधी भाजपच्या मंडळींशी संवाद साधला नाही. समसस्यांचे निराकरण केले नाही .उलट भाजप कशी कमजोर होईल यालाच प्राधान्य दिले अशी चर्चा आहे. सामाजिक,राजकीय आणि बहुचर्चित सगेसोयरे संबंध जपण्यासाठी भाजपातील मुठभर प्रस्थापित नेते च फक्त प्रतापरावांचे नांव पुढे करित आहेत.जिल्ह्यातील भाजप प्रेमी मतदारांमध्ये तीव्र नाराजी आहे. भाजपचे जळगाव जामोदचे आमदार संजय कुटे हे बुलढाणा लोकसभेत प्रतापराव जाधव यांच्या तिकीटासाठी फारच आग्रही असल्याचे दिसून येत आहे. दोन दिवसांपूर्वी कुटे यांनी एक्स हँडलवर एक ट्वीट करून प्रतापरावच नंबर वन असा संदेश दिला होता. आता जिल्ह्यातील भाजपचे पदाधिकारी प्रतापरावांबाबत प्रचंड नाराज असताना कुटे यांना प्रतापरावांचा एव्हढा पुळका कशासाठी,असा प्रश्न पक्षातच विचारला जात आहे. कुटे यांनी कमीत कमी अशाप्रकारचे बोलले जात आहे. दुसरीकडे प्रतापराव यांनी गुरुवारी भाजप-शिवसेनेचा मेळावा घेतला खरा, परंतु त्याला भाजपच्या लोकसभा मतदारसंघाच्या प्रभारीच अनुपस्थित असल्यामुळे राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावल्या आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्हा भाजपमध्ये मोठी कुजबुज सुरू आहे की, काहीही झाले तरी २०२४ साली बुलढाणा जिल्ह्यात हा भाजपचाच उमेदवार असणे गरजेचे आहे. यातच काही महिन्यांपूर्वी भाजपचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुलढाण्यात येऊन वक्तव्य दिले होते, की बुलढाण्याचा पुढचा खासदार हा भापजचाच असेल. तेंव्हापासून भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या शिडामध्ये प्रचंड हवा भरली गेली. परंतु गेल्या अनेक वर्षांपासून युतीमध्ये बुलढाण्याची जागा ही शिवसेनेकडेच राहिली आहे. बाळासाहेब ठाकरे, गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन यासारखी मंडळी जीवंत असताना युतीमध्ये एक जबरदस्त असा समन्वय होता. हा समन्वयक २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत कायम होता, परंतु समन्वयाचा हा अभेद्य बुरूज २०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या वेळेस अक्षरशः भराभर कोसळून पडला. त्या वेळी भाजप, शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी या सर्वांनी स्वतंत्रपणे निवडणुका लढवल्या व आपली-आपली ताकद आजमावून पाहिली. त्यानंतर २०१९ च्या लोकसभेच्या पुन्हा भाजप-शिवसेना युती झाली व ही लोकसभेची जागा शिवसेनेकडेच राहिली. गेल्या अनेक दशकांपासून ही जागा शिवसेनेकडे असल्या कारणाने भाजपचा कार्यकर्ता कधीही लोकसभेसाठी जिल्ह्यातून उभा राहू शकला नाही. सुमारे पावणेदोन वर्षांपूर्वी शिवसेनेत उभी फूट पडली. आज भाजपची युती शिवसेने (शिंदे गट) सोबत आहे. परंतु शिवसेनेची आता ती ताकद राहिली नाही, जी ताकद फूट पडण्यापूर्वी होती. त्यामुळे भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आता जबरदस्त आग्रह धरलेला आहे की, आता तरी ही जागा भाजपलाच मिळावी. खासदार प्रतापराव जाधव हे शिंदे यांच्यासोबत गेल्याने शिवसेनेच्या वतीने आपण पुन्हा उमेदवार असू, या प्रचंड भ्रमात प्रतापराव पहिल्यापासूनच आहेत. भाजप पदाधिकाऱ्यांचा संपूर्ण आग्रहाचा खटाटोप यासाठीच सुरू आहे की, गेल्या १५ वर्षांपूसन जिल्ह्यातील भाजपचे कार्यकर्ते शिवसेनेच्या उमेदवारी धुणी धुत आहेत. परंतु त्यांना म्हणावा तसा सम्मान, प्रतिसाद प्रतापरावांकडून मिळाला नाही. त्यामुळे या वेळेस तरी जिल्ह्यात आपल्याच पक्षाचा उमेदवार असावा, असा कट्टर आग्रह भाजप पदाधिकाऱ्यांचा व कार्यकर्त्यांचा आहे. भाजप प्रभारी यादव हे चार - पाच वेळा जिल्ह्यात येऊन गेले. त्यांच्याकडेही भाजप पदाधिकाऱ्यांनी हाच आग्रह धरला आहे. एकीकडे बहुसंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते प्रतापरावांना विरोध करीत असताना दुसरीकडे जळगाव जामोदचे आमदार संजय कुटे हे उघडपणे प्रतापरावांची बाजू घेताना दिसून येत आहेत. प्रतापरावच नंबर वन, असल्याचा अनाकलनीय आभास संजय कुटे यांना का झाला, हे अजून भाजपच्या पदाधिकाऱ्यांना देखील कळलेले दिसत नाही त्यामुळे कमीत कमी प्रतापरावांचे समर्थन करण्यापूर्वी कुटेंनी जिल्ह्यातील पक्ष पदाधिकाऱ्यांचा कानोसा घेतला नसण्याची शक्यता आहे. या सर्व धामधुमीत एक महत्वाचा मुद्दा आहे की, भाजप पदाधिकारी जाऊ द्या परंतु प्रतापरावांच्या विरोधात जनतेत प्रचंड नाराजी आहे. *काहीही करून एकीकडे भाजपला मोदींना ४०० पार न्यायचे आहे, त्यामुळे एका-एका जागेसाठी भाजप अत्यंत बारकाईने नियोजन करीत आहे. अशात जर प्रतापरावच पुन्हा उभे राहिले आणि निवडून आले नाहीत, तर ४०० पारच्या मिशनला मोठा धक्का लागण्याची शक्यता आहे. हाच विचार करून भाजप पदाधिकारी आपला उमेदवार देण्याची मागणी करीत आहेत. दुसरीकडे अशीही माहिती आहे की, प्रतापराव भाजपच्या कमळ चिन्हावर देखील निवडून लढवू शकतात. याचा अर्थ बाटलीत माल तोच, फक्त त्याचे लेबल बदलले. याने काहीही फरक पडणार नाही. जनतेत असलेला प्रतापराव विरोधी रोष याने कधीही शमणार नाही. त्यामुळे प्रतापरावांचे उमेदवारीचे देऊ सध्या तरी पाण्यातच दिसत आहे. त्यामुळे संजय कुटे यांनी प्रतापरावांचे अशाप्रकारचे अनाकलनीय समर्थन करू नये, एव्हढेच आमचे त्यांना सांगणे आहे. अजूनही वेळ आहे. या मतदारसंघात भाजपश्रेष्ठींनी भाजपचाच उमेदवार द्यावा अशी आग्रही विनंती मतदार राजा करित आहे.



जिल्ह्यातील भाजपा नेते आ.आकाश फुंडकर,आ.श्वेताताई महाले,योगेंद्र गोडे,मा.आ.विजयराज शिंदे आदी भाजपच्या विविध आघाडीचे प्रमुख नेते या सवांद मेळाव्याला उपस्थितीत न राहणे खमंग चर्चेचा विषय

# मेरा खुर्द येथील रोजगार हमी योजनेतील लाभार्थ्यांची चौकशी करा.

जनसंचलन/ चिखली

चिखली तालुक्यातील मेरा खुर्द येथील ग्रामपंचायत सरपंच तथा ग्रामपंचायत सचिव यांनी रोजगार हमी योजनेतील गरजु लाभार्थ्यांना डावलून आपल्या जवळच्या व्यक्तींचे नावे यादीमध्ये घेऊन मनमानी करत असल्याचा धक्कादायक प्रकार मेरा खुर्द घडला असल्याची तक्रार मेरा खुर्द येथील तक्रार गटविकास अधिकारी चिखली यांच्याकडे देण्यात आली आहे याबाबत मौजे मेरा खुर्द येथील अन्यायग्रस्त नागरिकांनी दि.१४मार्च २०२४रोजी चिखली पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना लेखी तक्रार दिली असुन रोजगार हमी योजनेतील विहीर व गुरांचा गोठा यामध्ये मोठ्या प्रमाणात मनमानी, अफरातफर करत केल्याचा आरोप संबंधित तक्रार कर्त्यांनी केला असुन रोजगार हमी योजनेची माहिती गावांमधील नागरिकांना देत नसुन सरपंच व सचिव उडवाउडवीची उत्तरे देतात.ग्रामसभेच्या ठरावा मध्ये ज्यांची नावे नाहीत त्यांच्या कागदपत्राची मागणी करणे,दलीत वस्तीचा आलेला निधी दलित वस्तीत खर्च न करता तो अवांतर ठिकाणी खर्च करण्याची तयारी सुरू आहे.या सर्व प्रकारच्या प्रयकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी.तसेच गावांतील गोरगरीब,लाभार्थ्यांना न्याय मिळत नाही तसेच गावातील अपंग व्यक्तींना अद्यापही घरकुल योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे सदर तक्रारीत नमूद आहे.दिपक शिंगणे, महेंद्र वाघमोडे,नदीम देशमुख,दमुता वाघमारे,सौ अनिता राजु गवई,प्रकाश भुसारी,अजय शिंदे,सतिष मोहबे यांच्या सदर निवेदनावर सह्या आहेत.

# लोणार तालुक्यात वन बुलडाणा मिशनच्या परिवर्तन रथयात्रेचे दणक्यात स्वागत

## संदीप शेळकेंचे सत्ताधारी खासदारांवर टीकास्त्र! म्हणाले, त्यांनी जिल्ह्याची वाट लावली...




जनसंचलन/ लोणार

विद्यमान खासदारांच्या १५ वर्षाच्या काळात जिल्हा विकासाच्या बाबतीत ५० वर्षे मागे गेला. लोणार, सिंदखेडराजा, संत नगरी शेगाव एवढं काही वैभव जिल्हाजवळ असुनदेखील नावालाही विकास दिसत नाही. केवळ लोकसभा सभागृहातील खुर्च्या उबवण्याच काम यांनी केलं का? असा सवाल करीत गेल्या १५ वर्षात जिल्ह्याच्या विकासाची वाट लावण्याचं काम खासदारांनी केलं असा घणाघात वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी केला. वन बुलडाणा मिशनची परिवर्तन रथयात्रा २० मार्चच्या सायंकाळी लोणार तालुक्यात दाखल झाली. यावेळी पिंपळनेर, जांबुल, देऊळगाव वायसा, वढव, आरडव, दाभा, गुंधा, वेणी या गावांत झालेल्या कॉर्नर सभेत संदीप शेळकेंनी मतदारांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना संदीप शेळके यांनी त्यांनी सुरू केलेल्या वन बुलडाणा मिशन या राजकीय लोकचळवळीची भूमिका विषद केली. जिल्ह्याचा सर्वांगीण ,सर्वव्यापी आणि तळागाळातल्या सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचणारा विकास आपल्याला अपेक्षित असल्याचे ते म्हणाले. जिल्ह्यातल्या प्रत्येक तालुक्यात एमआयडीसी उभी राहिली आणि उद्योगधंदे वाढले तर रोजगाराची संधी निर्माण होईल, पर्यायाने पुण्या मुंबईकडे जाणारा तरुणांचा ओघा थांबेल असे संदीप शेळके म्हणाले. शेतकऱ्यांना २४ तास वीज आणि पाणी हा विषय आपल्या अजेंड्यावर असून शेतमालाच्या भावासाठी देशाच्या संसदेत आवाज उठवणार असल्याचे ते म्हणाले. लोणार, सिंदखेडराजा, शेगाव, ज्ञानगंगा अभयारण्य, अंबाबारवा अभयारण्य या पर्यटनस्थळांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचेही संदीप शेळके म्हणाले. बुलडाणा जिल्ह्याची मागासलेपणाची ओळख पुसून टाकण्यासाठी लोकसभा निवडणुकीत परिवर्तन गरजेचे असल्याचे सांगत आपल्याला मतदान रुपी आशीर्वाद देण्याचे आवाहन त्यांनी केले. दरम्यान दुसऱ्या दिवशी २१ मार्चला देखील लोणार तालुक्यातील गावखेड्यात परिवर्तन रथयात्रेला जोरदार प्रतिसाद मिळाला. गायखेड, कुंडलस, पांग्रा डोळे, टिटवी, गोत्रा, नांद्रा, सावरगाव मुंडे, शिवणी जाट, किन्ही, धायफळ, बिबखेड, देवा नगर, भुमराळा या गावांतील मतदारांशी संदीप शेळकेंनी संवाद साधला.

# सैलानी यात्रेमुळे वाहतुकीमध्ये बदल

जनसंचलन/ रायपूर




रायपूर सैलानी बाबा यांचा ११७वा उर्स महोत्सव सैलानी येथे पार पडत असून यात्रेमुळे १९ मार्च ते ७ एप्रिलपर्यंत वाहतुकीमध्ये बदल करण्यात आला आहे. २४ मार्च रोजी होळी उत्सवात नारळांची होळी करण्यात येणार आहे. शे. रफिक मुजावर यांचे पिंपळगाव सराई येथील संदल घरामधून हजरत अब्दुल रहमान उर्फ सैलानी शाह मिया यांची संदल मिरवणुक उंटनीवर निघुन दर्गाह या ठिकाणी पोहचुन चादर व चंदनाचा लेप लाऊन संदल दिनांक ३०.३.२०२४ रोजी सैलानी बाबा येथील दर्गावर संदल चढवल्या जाईल तसेच दि.३.४.२०२४ रोजी सकाळी ९.०० वा दरम्यान सैलानी बाबा दर्गा याठिकाणी फातेहाखानीचा कार्यक्रम होणार आहे. सदर सैलानी बाबा उर्स महोत्सवात सर्व धर्मीय भाविक लोक सामिल होतात तसेच सदर यात्रेत महाराष्ट्रातून तसेच लगतच्या राज्यातुन मोठ्या प्रमाणात भाविक येत असल्यामुळे यात्रेत अंदाजे ४ ते ५ लाख लोकांचा जमाव एकत्र येतो त्याअनुषंगाने सैलानी यात्रेत खबरदारीच्या सर्व उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर मार्गावर वाहतुक सुरु असल्यास अडथळा निर्माण होवुन एखादा अपघात होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या यात्रेस उपस्थित राहणाऱ्या जनतेच्या सुरक्षिततेसाठी व वाहतुकीच्या सुनियमनासाठी खालील पर्यायी मार्गाने २४ मार्च ते ७ एप्रिलपर्यंत सध्याचा मार्ग १) रायपूर-पिंपळगाव सराई-सैलानी- डासाळवाडी दुधा- असून पर्यायी नवीन मार्ग रायपूर- मातला- केसापूर-मालवंडी- दुधा तसेच (२) सध्याचा मार्ग दुधा- घाटनांद्रा- ढासाळवाडी-सैलानी पिंपळगाव सराई - रायपूर नवीन पर्यायी मार्ग दुधा - माळवंडी केसापूर- मातला रायपूर या नवीन मार्गाने रायपूर पोलीस स्टेशनच्या ठाणेदार दुर्गेश राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचाऱ्यांनी वाहतुकीस बदल करण्यात आला आहे

# धोत्रा नंदाई येथील शेतकऱ्याची आत्महत्या

जनसंचलन/देऊळगाव राजा

तालुक्यातील धोत्रा नंदाई येथील ४५ वर्षीय शेतकऱ्याने विहिरीत उडी घेऊन २० मार्च रोजी आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. पंढरीनाथ बाबूराव आंधळे (वय ४५) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांच्याकडे नऊ एक शेती होती. मात्र अवर्षणसदृश स्थितीमुळे होत असलेल्या नापिकीमुळे ते त्रस्त झाले होते. त्यांच्यावर बँकेचेही कर्ज होते. त्या मानसिक तणावातून त्यांनी आत्महत्या केल्याचे त्यांच्या नातेवाइकांचे म्हणणे आहे. त्यांच्या पश्चात भाऊ, पत्नी, मुलगा व बराच मोठा आप्तपरिवार आहे. २१ मार्च रोजी एक जण शेतात गेला असला त्याच्या हा प्रकार लक्षात आला.




# २३ वर्षीय विवाहितेवर तिघांचा सामूहिक बलात्कार

## आरोपी अटक; ६ दिवसांची पोलीस कोठडी...

जनसंचलन/मलकापूर



येथाल तुलसा नगर भाग-२ या ठिकाणी मित्राच्या रुमवर नेऊन एका २३ वर्षीय विवाहितेवर तिघांनी आळीपाळीने बलात्कार केल्याची घटना २० मार्च रोजी उघडकीस आली. याप्रकरणी महिलेने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले असून तिन्ही आरोपींना अटक करीत आज न्यायालया समोर हजर केले असता न्यायालयाने २६ मार्चपर्यंत सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, पळसखेड सपकाळ ता. चिखली येथील एक २३ वर्षीय महिला दोन युवकांच्या संपर्कात आली. त्यानंतर त्या दोघांनी त्या विवाहितेस आपल्या मोटरसायकलवर बसून मलकापूर येथे तुलसीनगर येथील एका खोलीवर १९ मार्च रोजी आणले. यावेळी त्याठिकाणी सुरज पंढरी शेवाळे (वय ३०) रा. मेहकर, विशाल भगवान शेवाळे (वय ३३) रा. मेहकर, आकाश संजय शेजूळ (वय २५) रा. वडगाव लोणार या तिघांनी तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला. सामूहिक सकाळी पिडीत युवती खोलीच्या बाहेर पडली असता घर मालकाने पिडीत युवतीची चौकशी केली. तेव्हा तिला काही सुचतच नसल्यामुळे घर मालकाने २० मार्च रोजी सकाळी पोलिसांना माहिती दिली. यावेळी मलकापूर उपविभागीय पोलिस अधिकारी देवराम गवळी, पोलिस निरीक्षक अनिल गोपाळ हे घटनास्थळी दाखल झाले. तर पीडित युवतीला उपचारासाठी रूग्णालयात दखल करण्यात आले. या दरम्यान पीडित महिलेने भावासह पोलीस स्टेशनमध्ये येऊन पोलिसांना घडलेल्या घटनेची सांगितली. आपबिती पीडित महिलेचे तक्रारी वरुन पोलिसांनी आज २१ मार्च रोजी आरोपी सुरज पंढरी शेवाळे, विशाल भगवान शेवाळे, आकाश संजय शेजूळ या तिघांना अटक करीत तिघांविरूध्द अप.नं. ३७/२४ कलम ३६३, ३६६, ३७६, ३७६ (ड) ५०६ कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. तर आज २१ मार्च रोजी दुपारी आरोपींना न्यायालयात हजर केले असता सामूहिक बलात्कार प्रकरणी तिघा आरोपींना २६ मार्चपर्यंत सहा दिवसांची पोलिस कोठडी न्यायालयाने सुनावली.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जलजागृती सप्ताहात महिला मेळावा, रांगोळी स्पर्धा




जनसंचलन/बुलढाणा

जलजागृती सप्ताहानिमित्त जलसंपदा विभागामार्फत महिला मेळावा आणि रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. यात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. जलसंपदा विभागातर्फे १६ ते २२ मार्च दरम्यान जलजागृती सप्ताह राबविण्यात येत आहे. सप्ताहानिमित्ताने दि. १९ मार्च २०२४ रोजी महिला मेळावा आणि रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. रांगोळी स्पर्धा आणि महिला मेळाव्यात महिलांमध्ये ठ्पाणी वाचवाफयाबाबत प्रबोधन करण्यात आले. पाटबंधारे विभागाच्या उपकार्यकारी अभियंता क्षितीजा गायकवाड अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून मृद व जलसंधारण विभागाच्या प्राची गालफाडे उपस्थित होत्या. रांगोळी स्पर्धेत प्रथम निता साळवे, द्वितीय वनिता जाधव आणि तृतीय क्रमांक आश्विनी दांडगे यांनी पटकाविला. सुरेखा जाधव आणि श्रीमती तोमर यांनी सूत्रसंचालन केले. श्रीमती अहेर यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी श्रीमती घोडे, श्रीमती झावरे, श्रीमती दिक्षीत, श्रीमती दांडगे, श्रीमती वाघ, श्रीमती इंगळे, श्रीमती खोडे यांनी सहकार्य केले.

# संग्रामपूर येथे वसतीगृह इमारत भाड्याने देण्यासाठी संपर्क साधावा...

जनसंचलन/ संग्रामपूर

संग्रामपूर येथे आदिवासी मुलींच्या वसतीगृहासाठी इमारत भाडेतत्वावर घ्यावयाची आहे. इमारत मालकांनी वसतीगृह कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. गृहपाल, आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, संग्रामपूर करीता भाड्याने इमारत घ्यावयाची आहे. मुलींना राहाण्यायोग्य सुरक्षित, पिण्याचे तसेच वापराच्या पाण्याची मुबलकता, विजेची सुविधांयुक्त मोठी इमारत संग्रामपूर परिसरात उपलब्ध असल्यास, तसेच शासकीय वसतीगृहाकरीता भाड्याने देण्यास इच्छुक असल्यास इमारत मालकांनी गृहपाल, आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, संग्रामपूर, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, ता. संग्रामपूर या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पवित्र रमजान निमित्त जमियते उलमाच्या वतीने ५०० कि.ग्राम खजूर आणि ३०० लिटर रूहअब्जा शरबतचे वाटप...

## रोजा म्हणजे केवळ उपाशी राहणे नाही - हाजी रिजवान जड्डा

जनसंचलन/ लोणार

दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा पवित्र रमजानच्या निमित्ताने महाराष्ट्र जमियते उलमा ए हिंदच्या वतीने राज्याध्यक्ष हाफिज़ नदीम सिद्दिकी व विदर्भ अध्यक्ष मुफ्ती रोशन शाह कासमी यांच्या मार्गदर्शनाखाली १२ ते १८ मार्च २०२४ दरम्यान लोणार जमियते उलमा ए हिंदे लोणार तालुक्यातील सर्व मशिदीमध्ये रोजदारांसाठी यावर्षी ५०० किलोग्राम पेंड खजूर आणि ३०० लिटर रूहअब्जा शरबतचे वाटप केले. काय आहे रमजान आणि रोजा चा अर्थ? इस्लाम धर्मानुसार अरबी वर्षातील ९व्या महिन्याला म्हणजे उपवासाच्या महिन्याला रमजान म्हणतात. या काळात इस्लाम धर्माचे लोक उपवास ठेवतात उपवास केल्याने सर्व पापांची क्षमा होतो अशी धारणा आहे. रोजा या शब्दाला अरबी भाषेत सौम म्हणतात ज्याचा अर्थ स्वतःवर नियंत्रण ठेवणे असा होतो, उपवास म्हणजे थांबणे स्वतःवर नियंत्रण ठेवणे असेही म्हणता येईल. रोजा म्हणजे केवळ उपाशी राहणे नसून त्यापेक्षा



अनेक नियम पाळावे लागतात यात डोळे कान आणि तोंडावर ही बंधने येतात. कोणतेही वाईट ऐकले जात नाही किंवा कोणतेही अपशब्द वापरली जात नाही. या महिन्यामध्ये जास्तीत जास्त गरजू लोकांना मदत करण्यात येतो, अशी माहिती यावेळी लोणार जमीयतचे तालुकाध्यक्ष हाजी मो. रिजवान जड्डा यांनी दिली. लोणार तालुक्यातील सर्व मशिदींमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन खजूर आणि शरबत वाटप करण्यामध्ये लोणार जमीयतचे कार्यकर्ते रिजवान खान करामत खान, मौलाना शफीयुद्दीन मिल्ली, साबीर अली, हाजी ईक्रामुद्दीन, हाजी नजीर खान, हाजी शेख वहाब सह इतर सर्व कार्यकर्त्यांनी आपला मोलाचा वाटा लावला.

# न्यायाधिकरणात सीमीवरील बंदीबाबत आक्षेप नोंदविण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

स्टुडंटस् इस्लामीक मुव्हमेंट ऑफ इंडिया या संघटनेवरील बंदीबाबत आक्षेप असल्यास संबंधितांनी नवी दिल्ली येथील न्यायाधिकरण समक्ष दि. ९ एप्रिल २०२४ रोजी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने यांनी केले आहे. रजिस्टार निबंधक, बेकायदेशीर हालचाली प्रतिबंधक न्यायाधिकरण, खोली क्र. १६, उच्च न्यायालय, शेर शहा रोड, नवी दिल्ली यांच्या न्यायालयात सुचना क्रमांक एसओ ३५४ (ई) दि. २९ जानेवारी २०२४ अन्वये बेकायदेशीर हालचाली प्रतिबंध अधिनियम १९६७ कलम (३) (१) द्वारे स्टुडंटस् इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया या संघटनेस बेकायदेशीर संघटना म्हणून घोषित करुन बंदी घालण्यात आली आहे. त्यानुसार गृह मंत्रालय, भारत सरकारने स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया या संघटनेस बेकायदेशीर हालचाली प्रतिबंध अधिनियम १९६७ कलम (३) (१) बेकायदेशीर संघटना म्हणून घोषित करुन ५ वर्षाकरीता बंदी घातली आहे. त्याबाबत काही आक्षेप असल्यास किंवा म्हणणे मांडण्याकरीता रजिस्टार निबंधक, बेकादेशीर हालचाली प्रतिबंध न्याधिकरण, खोली क्र. १६, उच्च न्यायालय, शेर शहा रोड, नवी दिल्ली येथे दि. ९ एप्रिल २०२४ रोजी दुपारी ४.३० वाजता हजर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ग्रामपंचायत कडून प्रश्नमंजुषा संपन्न...

जनसंचलन/ सिंदखेडराजा

सिंदखेडराजा तालुक्यातील ग्रामपंचायत रूम्हना यांच्याकडून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या बुद्धिमत्तेला वाव मिळावा म्हणून, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली होती, सदर स्पर्धेचे आयोजन, जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेमध्ये करण्यात आले होते, तीन विद्यार्थ्यांना ग्रामपंचायत कडून बक्षीस वितरण करण्यात येणार आहे, सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक गंगाधर खरात, सहाय्यक शिक्षक संपत गलबे, खरात, शेवाळे यांनी



परिश्रम घेतले, सदर स्पर्धेचे आयोजन सरपंच शशिकला भोसले, उपसरपंच शिवगंगा जायभाये, प्राध्यापक शिवराज कायंदे, व सचिव विनोद सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली होती

# सोनाळा येथील मोटार रिवाइंडिंगचे दुकान फोडले

जनसंचलन/ संग्रामपूर

गेल्या काही महिन्यांपासून चोऱ्यांचे सत्र वाढल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केला जात आहे. पोलिसांकडून योग्य दिशेने तपास होत नसल्याने चोरट्यांनी ग्रामीण भागात अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. संग्रामपूर तालुक्यातील सोनाळा येथे राज्य महामार्गावरील जि. प. मुलाच्या शाळेलगत ग्रामपंचायतीचे शॉपिंग कॉम्प्लेक्स आहे. बुधवारी रात्री या कॉम्प्लेक्स मधील १० व ११ क्रमांकाचे मोटार रिवाइंडिंग दुकान व ॲटो गॅरेज दुकानातील साहित्यावर अज्ञात चोरट्यांनी हात साफ केला. अज्ञात चोरट्याने दुरुस्तीसाठी आलेले ५७ हजार रुपये किमतीचे शेतीपंप लंपास केले. ही घटना गुरुवारी सकाळी ७ वाजतादरम्यान उघडकीस आली. मोटर रिवाइंडिंग दुकानदार गोपाल शामलाल मावतलाल यांच्या मोटर वाइंडिंग दुकानाला लागून असलेले शुभम ॲटो गॅरेजचे मालक नंदकिशोर शालीग्राम रोहणकर हे सकाळी गॅरेज उघडण्यास आले. त्यांना दुकानाचे कुलूप तोडलेले दिसले. तर लगतच असलेली मोटर दुरुस्ती दुकानाचे कुलूप तोडलेले होते. सोनाळा येथील मोटार रिवाइंडिंगचे दुकान फोडून साहित्य लंपास केले गेले. अज्ञात चोरट्याने सिंगल फेज ५ हॉर्सपावर, १० हॉर्सपॉवर वाइंडिंग सबमर्सिबल असे एकूण ५७ हजाराचे मोटरपंप लंपास केले. दरम्यान, सोनाळा पोलिसांनी कायदा व सुव्यवस्थेकडे दुर्लक्ष केल्याने ठाणे हद्दीत गुन्हेगारीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

# पवार विरुद्ध पवार, बारामतीत नणंद-भावजय लढत रंगतदार, बारामतीकडे देशाचे लक्ष...

वृत्तसंस्था/बारामती

आयुष्यभर राजकारणाचे ज्याच्याकडे धडे गिरविले, त्या वस्तादाच्या विरोधात पठ्ठ्या लढत जिंकणार, की हाताशी राखून ठेवलेले चार डाव वस्ताद टाकणार, यावर बारामतीच्या फडाचा निकाल ठरणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर पवार कुटुंबातील नणंद आणि भावजय परस्परांच्या विरोधात निवडणूक लढवतील, ही काही महिन्यांपूर्वी कोणी कल्पनाही केली नव्हती, अशी लढत यंदा निवडणुकीत प्रत्यक्षात येत आहे. खासदार सुप्रिया सुळे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा यांच्यातील लढतीकडे साऱ्या देशाचे लक्ष आहे. शरद पवार यांचे वर्षानुवर्षे बारामतीवर वर्चस्व आहे. या लोकसभा मतदारसंघात काँग्रेस किंवा भाजपासारख्या पक्षांना हातपाय पसरण्यास आतापर्यंत फारसा वाव मिळाला नाही. आतापर्यंत काँग्रेस-राष्ट्रवादी विरुद्ध भाजप-शिवसेना युती अशी लढत झाली. त्यात भाजपचा पराभव झाला; परंतु गेल्या दोन निवडणुकांमध्ये भाजपने चांगली मते मिळवित या मतदारसंघात पाय रोवले आहेत. आता अजित पवार भाजपसोबत गेल्याने त्यांचे बळ वाढले असून, ही लढत रंगतदार होत आहे. बारामतीमध्ये दोन पक्षांत होणारी लढत आता एका कुटुंबातच लढविण्यात भाजपाला यश मिळाल्याचे बोलले जात आहे.अर्थात, महायुतीमध्येही सारे काही आलबेल नाही. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी आपले राजकीय भविष्य डोळ्यासमोर ठेवून घेतलेली भूमिका चर्चेत आहे. शिवसेनेचे माजी आमदार विजय शिवतारे यांचा अजित पवार यांना लक्ष्य करून निवडणूक लढविण्याचा पवित्रा यांचा निवडणुकीवर काय परिणाम होणार, हेही महत्वाचे आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये फूट पडल्यानंतर शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना सहानुभूतीचा मुद्दा आहे, तसेच अजित पवार यांच्या संघटन कौशल्याचाही मुद्दा महत्त्वाचा आहे.बारामती लोकसभा मतदारसंघात





बारामती, दौंड, इंदापूर, पुरंदर, भोर-वेल्हा- मुळशी आणि खडकवासला असे सहा विधानसभा मतदारसंघ आहेत. बारामती, इंदापूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) आमदार आहेत, तर दौंड, खडकवासला भाजपकडे आहेत. भोर-वेल्हा-मुळशी आणि पुरंदरमध्ये काँग्रेसचे आमदार आहेत.

# आर्थिक फसवणूक करत महिलेवर अत्याचार, समाजमाध्यमावर चित्रफीत केली व्हायरल

जनसंचलन/मेहकर

मुलीला नोकरी लावण्याचे आमिष दाखवून महिलेसह तिच्या पतीकडून ३५ लाख रुपये घेण्यासोबतच महिलेस चिखलीत बोलून तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी मेहकर पोलिसांनी वाशिम जिल्ह्यातील रिसोड येथील संजय तुकाराम जाधव राहणार उकीर खेड आणि संदीप प्रभाकर वानखेडे राहणार लावणा तालुका मेहकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.२० मार्च रोजी पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, आरोपींच्या शोधासाठी मेहकर पोलिसांनी एक पथक पाठवले आहे. संजय तुकाराम जाधव (४०, रा. उकीरखेड, ता. रिसोड) आणि संदीप प्रभाकरराव वानखेडे (४८, रा. लावणा, ता. मेहकर) यांनी पीडित महिला व तिच्या पतीकडून मुलीला नोकरी लावण्याचे आमिष



दाखवत ३५ लाख रुपये घेतले होते. सोबतच पीडित महिलेस चिखली विश्रामगृहाजवळ बोलावून एका बंद खोलीत नेत संदीप वानखेडे याने तिला चाकूचा धाक दाखवत अत्याचार केला. दुसरा आरोपी संजय जाधव याने याचे चित्रीकरण केले. ही घटना २०२० मध्ये घडली होती. दरम्यान आरोपींनी त्यावेळी केलेले बलात्काराचे चित्रीकरण आता समाजमाध्यमावर टाकून महिलेची बदनामी केली, अशी तक्रार महिलेने २० त्यावरून पोलिसांनी आरोपी संजय तुकाराम जाधव व संदीप प्रभाकरराव वानखेडे यांच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहे. घटनेचा पुढील तपास मेहकर पोलिस करत आहेत. अद्याप आरोपींचा शोध पोलिसांना लागला नसून, पोलिस त्यांचा शोध घेत आहे.

# ठिबकच्या नळ्या चोरल्या,लाखाचे झाले नुकसान...

## पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल केला

जनसंचलन/ मोताळा

सात एकरातील अंदाजे एक लाख रुपयांच्या ठिबक सिंचनाच्या नळ्या अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना २० मार्च रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास सहस्त्रमुळी शिवारात उघडकीस आली. याप्रकरणी तक्रारीवरून बोराखेडी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील सहस्त्रमुळी येथील ईश्वर सुरजमल मंझरेठे यांनी बोराखेडी पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांची गावशिवारात शेती असून २० मार्च रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास त्यांच्या सात एकरातील १२ एमएमच्या जवळपास एक लाख रुपये किमतीच्या ठिबक नळ्या कोणीतरी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याचे दिसून आले, अशी ईश्वर मंझरेठे




यांनी बोराखेडी पोलिसांत तक्रार दिली आहे. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला असून घटनेचा पुढील तपास सहाक पोलिस उपनिरीक्षक यशवंत तायडे व पोलिस कॉन्स्टेबल सुनील भवटे हे करीत आहेत. दरम्यान मोताळा तालुक्यात यापूर्वीही कृषी साहित्याची चोरी होण्याच्या घटना घडल्या आहेत. आता त्यात वाढ होत असल्याचे एकंदरीत चित्र आहे. डोणगाव परिसरातही स्प्रिंकलच्या तोट्या चोरून नेल्याच्या घटना घडल्या आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958